प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. २१.०२.२०२२

**सिडकोकडून दुसऱ्या टप्प्यात ६८.४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागाला हस्तांतरण**

सिडकोकडून २१ फेब्रुवारी २०२२ रोजी दुसऱ्या टप्प्यात पनवेल तालुक्यातील, सिडको अधिकारक्षेत्रातील ६८.४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे हस्तांतरण वन विभागाच्या कांदळवन कक्षाला करण्यात आले. डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या हस्ते श्री. एम आदर्श रेड्डी, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना सदर कांदळवन क्षेत्राचे हस्तांतरण करण्यात आले. या आधीच्या पहिल्या टप्प्यात सिडकोने आपल्या अधिकारक्षेत्रातील २८१.७७ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागाला हस्तातंरण केले आहे. कांदळवनांचे पर्यावरणाच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात घेऊन, कांदळवनांचे “राखीव वने” म्हणून संरक्षण व्हावे, या उद्देशाने सिडकोकडून कांदळवनांचे हस्तातंरण करण्यात आले आहे.

**“सिडको पर्यावरणाचे जतन व शाश्वत विकास करण्यासाठी नेहमीच कटीबद्ध आहे. नवी मुंबईचे नियोजन करताना, सिडकोने उद्यान, क्रीडांगणे आणि एनडीझेडसह (Non Development Zone) सुमारे ४०% क्षेत्र हरितक्षेत्रासाठी ठेवले होते. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली आत्तापर्यंत सिडकोने अंदाजे 2000 हेक्टर जमीन वनविभागाला सुपूर्द केली आहे. त्यामुळे कांदळवनांच्या जमिनींचे एवढे मोठे क्षेत्र हस्तांतरण करणारी सिडको ही एकमेव सार्वजनिक क्षेत्रातील एकमेव सरकारी संस्था आहे.**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

या प्रसंगी श्री. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक सिडको, श्री. रविकुमार, मुख्य नियोजनकार (बांधकाम परवाना), श्री. सतिशकुमार खडके, अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन) आणि सिडकोतील अन्य अधिकारी त्याचप्रमाणे कांदळवन कक्ष, मुंबई यांच्यातर्फे श्री. डी. एस. कुकडे, वनक्षेत्रपाल, नवी मुंबईदेखील उपस्थित होते.

मुंबई महानगर प्रदेशातील कांदळवनांचे संरक्षण आणि जतन व्हावे याकरिता संबंधित शासन संस्था व प्राधिकरणांकडून आपल्या अधिकारक्षेत्रातील कांदळवन क्षेत्रांचे हस्तांतरण वन विभागाच्या कांदळवन कक्षाकडे करण्यात येत आहे. सिडकोतर्फे यापूर्वी पहिल्या टप्प्यात पनवेल तालुक्यातील कामोठे येथील १३४ हेक्टर, पनवेल येथील ३८ हेक्टर व कोल्हे-खार येथील १०९ हेक्टर, अशा एकूण २८१.७७ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे

ऑगस्ट २०२१ मध्ये वन विभागाकडे हस्तांतरण करण्यात आले होते. दुसऱ्या टप्प्यात सिडकोकडून पनवेल तालुक्यातील उलवे येथील २४.२० हेक्टर, वहाळमधील ३.१५ हेक्टर, वाघिवलीतील ३९.९४ हेक्टर आणि सोनखारमधील ०.७५ हेक्टर, अशा एकूण ६८.४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे हस्तातंरण वन विभागाला करण्यात आले. त्याचप्रमाणे सिडकोने कांदळवन कक्षाच्या सहाय्याने ३७० हेक्टरवर खारफुटीची लागवड केली आहे. याचबरोबर मॅन्ग्रोव्ह इंटरप्रिटेशन सेलदेखील ऐरोली येथे आहे.

जमिनीची धूप होण्यापासून वाचवण्यासह पुराचे पाणी व वादळाला अटकाव करण्यामध्ये कांदळवने महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच अनेक पशू-पक्षी व जलचरांचा कांदळवनांमध्ये अधिवास असतो. हे लक्षात घेऊन कांदळवनांना पुरेसे वैधानिक संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून कांदळवन क्षेत्र अधिसूचित करून, सिडकोकडून उपरोक्त कांदळवन क्षेत्राचा ताबा कांदळवन कक्षाला देण्यात आला.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**